ज्ञानेश्वर माऊलीवर अपार श्रद्धा, भक्ती असलेल्या नर्मदेची भावूक व्यक्तिरेखा साकार करून १९४० साली सुमतीताई रूपेरी पडद्यावर सर्वप्रथम रूजू झाल्या.

प्रभात चित्रचा *संत ज्ञानेश्वर* ते त्यांच्या स्वतःच्या मधुमुव्हीजचा १९७९ सालचा *जानकी* असा त्यांचा चार दशकांचा अभिनय क्षेत्रातील प्रवास. *जानकी*च्या त्या निर्मात्या आणि कथा लेखिकाही. त्यांचे पती वसंतराव जोगळेकर यांनी *जानकी*चं दिग्दर्शन केलं होतं आणि महाराष्ट्र शासनाच्या १९७८-७९च्या चित्रपट महोत्सवात *जानकी*ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचं अव्वल क्रमांकाचं चित्रमहर्षी दादासाहेब फाळके पारितोषिक मिळालं होतं. सुमतीताईंच्या हृदयस्पर्शी कौटुंबिक कथेची आणि त्यांच्या भावपूर्ण अभिनयाची तेव्हा प्रशंसाही खूप झाली.

*जानकी*नंतर त्यांनी चित्रपटात काम करणं बंद केलं. पण अधूनमधून त्या चित्रपट निर्मिती करीत राहिल्या. मधुमुव्हीजचा ताजा चित्रपट *वाट पाहते पुनवेची*. तो १९९२ प्रदर्शित झाला. त्यांचे छायालेखक दिर बाळ जोगळेकर व पुतणे किशोर जोगळेकर यांनी तो दिग्दर्शित केला होता.

सुमतीताईंच्या अभिनयाचा, चित्रसृष्टीतील कामगिरीचा असा अनेकदा गौरव झाला आहे. सहा महिन्यापूर्वीच त्यांना ग. दि. माडगूळकर प्रतिष्ठानचा गृहिणी, सखी, माता हा विशेष पुरस्कार लाभला. त्यापूर्वी १९६२ साली रसरंगचा फाळके पुरस्कारही त्यांनी मिळविला होता. *क्षण आला भाग्याचा*मधील त्यांची प्रमुख भूमिका सर्वोत्कृष्ट ठरली होती.

पण महाराष्ट्र शासनाचा हा व्ही. शांताराम पुरस्कार राज्यातील सर्वोच्च दादासाहेब फाळके ह्या राष्ट्रीय पुरस्कारालाच आदर्श म्हणून डोळ्यासमोर ठेवून चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ काळच्या सेवेबद्दल राज्यातील कलावंतांना तो प्रतीवर्षी देण्यात येतो. सव्वा लाख रूपये रोख,

"ह्या व्ही. शांताराम पुरस्काराचं माझ्या दृष्टीने आगळं वेगळंच महत्त्व आहे. पुरस्कार मिळाल्याचा अत्यानंद होणं हे साहजिकच. कारण त्यांच्याच प्रभातमध्ये माझ्या कलाजीवनाचा उदय झाला." यंदाच्या पुरस्कार विजेत्या सुमती गुप्ते यांची ही पहिली प्रतिक्रिया!

□ वसंत भालेकर



यंदाच्या व्ही. शांताराम पुरस्काराच्या मानकरी

सुमती गुप्ते: क्षण आला भाग्याचा!

शाल, श्रीफळ, मानपत्र आणि सन्मान चिन्ह असं या व्ही. शांताराम पुरस्काराचं स्वरूप असून यापूर्वी तो चंद्रकांत मांडरे, सुधीर फडके, ललिता पवार, सुलोचना आणि दिनकर द. पाटील यांना लाभला आहे.

प्रत्यक्षात शांताराम बापूंच्या दिग्दर्शनाखाली काम करण्याचं भाग्य मला लाभलं नाही. प्रभातच्या *संत ज्ञानेश्वर* आणि *श्री गुरूदेव दत्त* या दोन चित्रपटात मी प्रमुख भूमिका केल्या. त्यापैकी *संत ज्ञानेश्वर*चे दिग्दर्शक होते दामले-फत्तेलाल तर *श्री गुरूदेव दत्त*चं दिग्दर्शन केलं रा. वि. राणे यांनी.

माझी सर्वात आवडती भूमिका 'मौसी'ची शांताराम बापूंच्याच राजकमल कला मंदिराचा हा कौटुंबिकपट. त्याचं दिग्दर्शन केलं होतं शांताराम बापूंचे पुत्र प्रभातकुमार यांनी.

परंतु शांताराम बापूनी *संत ज्ञानेश्वर*मध्ये फक्त एक दृश्य दिग्दर्शित करताना त्यांनी मला जो अभिनय शिकविला, कॅमेऱ्यासमोरील अभिनयाचं वेगळं तंत्र समजावून सांगितलं, चालण्या-बोलण्यातील बारीक सारीक गोष्टी स्वतः अभिनय करून समजावल्या ती शिदोरी मला अभिनयाच्या पुढच्या चाळीस वर्षांच्या वाटचालीत पुरली.


ज्ञानेश्वर नदीतून स्नान करून घाटाच्या पायऱ्या चढून वर येतात. पुढं चालत जाताना त्यांच्या ओल्या पावलांचे घाटावरील फरशीवर ठसे उमटतात. नर्मदा त्या प्रत्येक ठशावर एकेक ताजं फूल ठेवून नमस्कार करते असं ते दृश्य होतं. त्या दृश्याचं जगभर कौतुक झालं. *संत ज्ञानेश्वर*मधील ते सर्वोत्कृष्ट, संस्मरणीय दृश्य ठरलं. अण्णांच्या प्रतिभाविलासाचा तो आगळाच नमुना होता.

तरीही एका गोष्टीची मात्र सुमतीबाईंना खंत वाटते. *मौसी* चित्रपट कुमार ऐवजी शांताराम बापूंनी दिग्दर्शित केला असता तर त्याचं आणि माझ्याही कलाजीवनाचं सोनं झालं असतं.

मला लाभलेली एक अप्रतीम भूमिका कुमारच्या दुराग्रहापायी नाहक नासली. *मौसीला* मोठं व्यावसायिक यश मिळालं नाही. तिचं व्हावं तसं कौतुकही झालं नाही. तरीही माझी ती सर्वात आवडती भूमिका, माझ्या संस्मरणीय भूमिका *थोरातांची कमळा, सूनबाई, ऊन पाऊस* आणि *क्षण आला भाग्याचा* यासारख्या चित्रपटाचा आजही जुनी मंडळी आवर्जून उल्लेख करतात. माझ्या त्या भूमिका चांगल्याच होत्या. भालजी पेंढारकर, राजा परांजपे दत्ता धर्माधिकारी यासारख्या प्रतिभावान दिग्दर्शकांनी त्या माझ्याकडून वठवून घेतल्या होत्या. *ऊन पाऊस* आणि *क्षण आला भाग्याचा*मध्ये तर खुद्द राजाभाऊंनीच पडद्यावर मला समरसून साथ दिली हाती. आजही लोक म्हणतात रूपेरी पडद्यावर असं लोभसवाणं, भावूक, भाबडं, स्वप्नील वृद्ध जोडपं कधी पहायलाच मिळालं नाही.



नातीबरोबर एका जाहीर समारंभात



अजिंक्य देवच्या बारशाला सुलोचनाबाई व देव उभयतांसह सुमती गुप्ते

खुद्द वसंतराव जोगळेकरांनी माझ्याकडून *साखरपुडा*मधील स्वप्नवेडी पण तितकीच करारी नायिका आणि *शेवटचा मालुसरा*मधील देशाभिमानाने शरीर-मनाने पेटून उठलेली तेजस्वी माताही उत्तम प्रकारे साकार करून घेतली होती. तरीही माझ्या मनोमनी 'मौसी'च सर्वात वरच्या क्रमांकावर आहे!''

सुमती गुप्ते तशा खरोखरीच भाग्यवान व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, दामले-फत्तेलाल मास्टर, विनायक राजा परांजपे, आचार्य अत्रे, द. स. अंबपकर, अनंत माने, दत्ता धर्माधिकारी, अनंत ठाकूर आणि वसंतराव जोगळेकर यासारख्या चित्रपट माध्यमावर आपला प्रभावी ठसा उमटविणाऱ्या सुजाण दिग्दर्शकांकडे काम करण्याची त्यांना संधी मिळाली.

बडोद्याला इंटरपर्यंत शिक्षण घेऊन त्यांनी १९३८ साली पुण्यात प्रभातमध्ये सिनेमात काम करण्यासाठी पाऊल ठेवलं. तेव्हा त्या अठरा वर्षांच्या होत्या. पदार्पणालाच 'प्रभात' सारखी मातबर चित्रसंस्था त्यांना लाभली. त्यामुळं त्यांच्या कलाजीवनाचा पाया मजबूत झाला.

पण माझं वर्तमानपत्रात प्रथम नाव झळकलं ते सिनेअभिनेत्री म्हणून नव्हे तर अष्टपैलू खेळाडू म्हणून. माझे वडील रामकृष्णपंत गुप्ते राधनपूर संस्थानात न्यायाधीश होते. त्यामुळं घरी शिक्षण इतकंच विविध कला-क्रीडा बाबतही अगदी अनुकूल वातावरण. माझी बहीण प्रभा डॉक्टर झाली. मी अभिनयाकडे वळले. पण त्यापूर्वी बडोद्याच्या महाराणी गर्ल्स् स्कूलमध्ये शिकत असताना मी मैदानही गाजवू लागले होते. बडोद्यात तेव्हा खोखो खूपच लोकप्रिय होता. मी त्यात एवढं प्राविण्य मिळविलं होतं की, भारतीय स्तरावरील खोखो स्पर्धातूनही गाजत होते. त्यामुळं उत्कृष्ट खोखोपटू म्हणून माझं नाव वृत्तपत्रातून छापून येत असे.

'प्रभात'बाबत आणखी एक सांगते, प्रभात कालात स्वतःला हरवून घेत सुमतीताई किंचित भावूक आवाजात उद्गारल्या, ''मी प्रभातचं वैभवही पाहिलंय आणि दारिद्र्य, विपन्नावस्थाही अनुभवली आहे.''

''*श्री गुरूदेव दत्त*ने प्रभातचा अस्त झाला. १९५२ साली हा पौराणिकपट कसाबसा पडद्यावर आला. रा. वि. राणे त्याचे दिग्दर्शक होते. विवेक अभ्यंकर दत्त आणि मी अनसूया.

अनसूया दत्ताला भोजन देते असं दृश्य होतं. अन्नाने भरलेलं ताट ती पुढ्यात ठेवते. तीन दिवस हे चित्रण चाललं. अन्नाचं ताट तसंच झाकून ठेवलेलं. तिसऱ्या दिवशी तर त्याला आंबट वास सुटला. मी ते हातात घ्यायलाही नकार दिला, पण विपन्नावस्था एवढी की रोज ताजं ताट आणणं परवडणारं नव्हतं!'' त्यांच्या आवाजातली हळहळ खरंच बोचरी होती.

संत ज्ञानेश्वर सुमतीताईंचा पहिलाच चित्रपट मराठीबरोबर हिंदी भाषेतही निघाला होता. मराठीतील नर्मदा हिंदी पडद्यावर गंगा म्हणून वावरली. त्यानंतर त्या मराठीबरोबर अनेक हिंदी चित्रपटातूनही प्रमुख भूमिका करू लागल्या होत्या. त्यांचा मुंबईच्या हिंदी चित्रसृष्टीतला पहिला चित्रपट *उर्वशी*. पुढे वसंतरावांनी स्वतःचीच पंचदीप चित्र ही स्वतःची चित्रपट संस्था सुरू करून त्याकाळी *कारिगर, आंचल, आज और कल, एक कली मुस्काई, प्रार्थना* यासारखे हिंदी चित्रपट निर्माण केले आणि मधुमुद्दीजद्वारा *शेवटचा मालुसरा, हा खेळ सावल्यांचा, जानकी* सारखे गाजलेले मराठी चित्रपटही त्यांचेच.

या सर्ववेळी सुमतीताई या प्रमुख घटक होत्या. प्रत्येक यशस्वी पुरूषाच्या मागे एक कर्तबगार स्त्री असते असं म्हणतात. वसंतराव जोगळेकर या उंचपुऱ्या राजबिंड्या, लोभसवाण्या व्यक्तिमत्त्वामागं सुमतीताई खंबीरपणे उभ्या होत्या.

मास्टर विनायक यांच्या प्रफुल्ल चित्र संस्थेत सुमतीताई *गजाभाऊ*मध्ये प्रमुख भूमिका रंगवित असताना वसंतराव तेथे *चिमुकला संसार*चं दिग्दर्शन करीत होते. विनायक-मीनाक्षी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या *चिमुकला संसार*ने सुलोचना आणि राजा गोसावी सारखे दोन अभिजात कलावंत चित्रसृष्टीला दिलेच. पण

(पान नं. ४५ वर)